दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक १५ • Title - Code :- MAHMAR4951 •सोमवार दि.०२ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

# छत्रपती शिवरायांच्या वाघनखांसाठी लंडनला जातोय हा अभिमानाचा क्षण-ना.मुनगंटीवार

## जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषात छत्रपतींच्या पुतळ्याला माल्यार्पण

## कार्यकर्त्यांचा जल्लोष अन् ढोल ताशांच्या निनादात लंडनकडे रवाना

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्यावर चालून आलेल्या अफजलखानाचा कोथळा वाघनखांनी बाहेर काढला हे आपण लहानपणापासून शिकलो आहोत; ऐकत आलो आहोत. ती वाघनखे ३५० व्या राज्याभिषेक वर्षात शिवप्रेमींच्या दर्शनाला भारतात आणण्याच्या दृष्टीने करार करण्यास लंडन येथे जाताना खूप अभिमान वाटतो आहे, असे भावोद्गार राज्याचे सांस्कृतिक कार्य, वन आणि मत्स्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी काढले. लंडन येथे रवाना होण्यापूर्वी मुंबई विमानतळ मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर ना. मुनगंटीवार कार्यकर्त्यांना संबोधित करत होते. आमदार पराग अळवणी, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चव्हाण, अमोल जाधव, विनीत गोरे, स्थानिक नगरसेविका यांच्यासह शेकडो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

ना. मुनगंटीवार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर पोहोचताच कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा दिल्या, ढोल ताशांचा गजर आणि लेझिम पथकाने परिसर दणाणून सोडला. यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहीती देत हे सरकार छत्रपती शिवाजी महाराज यांना अपेक्षित रयतेचे राज्य महाराष्ट्राला देण्याचा संकल्प करुन काम करीत असल्याचे स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहे, आमची प्रेरणा आहे त्यांच्या विचारसरणीला धरून केंद्रात नरेंद्र मोदी आणि राज्यात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार काम करीत आहे हे स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज आणि आता त्यांनी



वापरलेल्या वाघनखांबाबत शंका उपस्थित करणे दुर्दैवी असून; जेव्हा ब्रिटेनशी प्रत्यक्ष करार करण्याची वेळ आली त्याच वेळी केवळ जनतेच्या मनांत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली. आमदार पराग अळवणी यांनीही मनोगत व्यक्त करुन ना. सुधीर मुनगंटीवार यांना शुभेच्छा दिल्या. छत्रपती शिवाजी महाराज यांची युद्धकालीन शस्त्र असलेली ही वाघनखे ब्रिटनच्या विक्टोरिया अँड अलबर्ट म्युझियम मधून भारतात परत आणण्याबाबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यासाठी ना. सुधीर मुनगंटीवार रवाना झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचे ३५० वे वर्ष प्रारंभ होताच ही वाघनखे भारतात परत आणण्याचा संकल्प सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केला होता. यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांच्या नेतृत्वात केंद्र शासन तसेच आंतराष्ट्रीय पातळीवर ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला. १५ एप्रिल २०२३ रोजी मुंबई येथे ब्रिटेन चे पश्चिम भारत उप उच्चायुक्त अँलेन गँमेल यांच्यासह ब्रिटन च्या राजकीय व द्विपक्षीय संबंध उपप्रमुख श्रीमती इमोगेन स्टोन यांच्यासोबत बैठक घेवून महाराष्ट्र शासनाने व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट संग्रहालयाशी पत्रव्यवहार सुरू केला होता. मंगळवारी ३ ऑक्टोबर रोजी व्हिक्टोरिया अँड अलबर्ट म्युझियम येथे भेट देऊन या संग्रहालयाचे संचालक ट्रायस्टम हंट यांच्यासोबत त्यांची बैठक होईल व करारावर स्वक्षऱ्या होतील.

## आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केले शेतकऱ्यांना माती प्रदूषणाबाबत जागरुक

**वरोरा । प्रतिनिधी**

ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत महारोगी सेवा समिती द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाशी संलग्नित वरोरा येथील आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पांढरतळा येथील शेतकऱ्यांना माती प्रदूषणाबाबत जागरुक केले.

मृदा प्रदूषण हे जमिन व मातीचे होणारे अत्यंत गंभीर प्रदुषण आहे. मृदा प्रदूषित होण्याचे प्रमुख कारण म्हणजे कचऱ्याचे अनियंत्रित व्यवस्थापन, यामुळे जमिनीवर कचऱ्याच्या क्षेत्रफळात वाढ होत आहे. यासोबत अनेक विषारी व रासायनिक घटक जमिनीत मिसळले जात आहे. याशिवाय शेतीसाठी रासायनिक खतांचा जास्तीत जास्त वापर, एकच एक पिक वारंवार घेणे हे मातीसाठी घातक ठरत आहे. मातीचे प्रदुषण टाळण्यासाठी उपाय योजना म्हणून रासायनिक



व औद्योगिक कच-याची व्यवस्थित विल्हेवाट लावणे, शेतीसाठी रासायनिक खतांचा कमीत कमी वापर इ. माती हे अत्यंत दुर्लभ परंतु दुर्लक्षित संसाधन असून मातीचे संगोपन व सवंर्धन करणे ही काळाची गरज आहे.हा कार्यक्रम यशस्वीरीता पार पाडण्यासाठी आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस. पोतदार, कार्यक्रम प्रभारी डॉ.आर.वी. महाजन, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एन.पंचभाई व विषय विशेषज्ञ . एस. पी.वाघ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाबाबत तुषार बुरले, निरज आभारे, श्याम इरतकर, शरद गुरले, नकुल बकाल व रोहन मांजरे यांनी गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.

## सेवा पंधरवडा अंतर्गत बस स्थानक परिसर केला स्वच्छ देवराव भोंगळे यांच्या हस्ते सफाई कामगारांचा सत्कार

**राजुरा । प्रतिनिधी**

सेवा पंधरवडा 'स्वच्छता हीच सेवा अभियानाच्या' पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत भाजपा विधानसभा निवडणुक प्रमुख तथा माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत १ ऑक्टोंबर ला सकाळी राजुरा बसस्थानक परिसरात भाजपा पदाधिकारी, वनविभाग व राज्य परिवहन महामंडळ विभागाच्या कर्मचाऱ्यांनी 'एक तारिख, एक तास आणि एक साथ' या संकल्पनेनुसार स्वच्छतेसाठी सामुहिक श्रमदान केले. यावेळी बस स्थानक परिसरात राज्य परिवहन महामंडळ विभागाचा सफाई कामगार संदिप सोनेकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान ही केला.

याप्रसंगी बोलताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नऊ वर्षांपूर्वी महात्मा गांधी स्वच्छता भारत अभियानाची सुरुवात केली, यामाध्यमातून मोदीजींनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या




स्वच्छतेचा संदेश सर्वदूर पसरवत स्वच्छतेसाठी कृतिशील लोकचळवळ निर्माण केली आहे. याचाच एक भाग म्हणून आज आम्ही सामुहिक स्वच्छता करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. अशी भावना देवराव भोंगळे यांनी व्यक्त केली. यावेळी तालुकाध्यक्ष तथा माजी सभापती सुनिल उरकुडे, जिल्हा उपाध्यक्ष विनायक देशमुख, बसस्थानक प्रमुख मानिक बोबडे, क्षेत्र सहाय्यक प्रकाश मत्ते, भाऊराव चंदनखेडे, सुरेश रागीट, मिलिंद देशकर, विनोद नरेन्दुलवार, सोमेश्वर आईटलावार, अनिल बाळसराफ, श्रीकृष्ण गोरे, दीपक शर्मा, फारुख शेख, डॉ. उमाकांत धोटे, दीपक झाडे, उज्ज्वलाताई जयपुरकर, शुभांगी रागीट, शितल वाटेकर, ममता भोयर, वनरक्षक सुनिल गज्जलवार, संदिप तोडासे, मारोती चाफले, सामाजिक वनीकरणाचे वनपाल सुनिल मेश्राम, वनमजुर देवाजी शेंडे, गंगाधर भेंडारे, मयुर आत्राम, भाऊराव लांडे यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

## गडचिरोली पोलीस दलातर्फे 'एक तास स्वच्छतेसाठी' उपक्रमाचे आयोजन

### बाईक रॅलीमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सारथ्य-३०० अंमलदारांचा सहभाग



**गडचिरोली । प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियान हे भारत सरकारतर्फे चालविले जाणारे सर्वात महत्वाचे अभियान आहे. याचाच एक भाग म्हणुन स्वच्छता हि सेवा या मोहीमे अंतर्गत एक तारिख एक घंटा या उपक्रमाच्या अनुषंगाने गडचिरोली पोलीस दलातर्फे ०१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.०० ते ८.०० वा. पर्यंत पोलीस मुख्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व पोस्टे/उपपोस्टे/पोमकें येथे एक तास स्वच्छतेसाठी उपक्रमाचे व बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले.

सदर स्वच्छता उपक्रम हे पोलीस अधीक्षक कार्यालय, शौर्यस्थळ, पोलीस संकुल परिसर, पोलीस कॅन्टीन, सीआरपीएफ परिसर, पोलीस मुख्यालय परिसरातील जेटीएससी, एकलव्य हॉल, पोलीस कवायत मैदान, शहिद पांडू आलाम सभागृह इ. परिसरात तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व पोस्टे / उपपोस्टे/पोमकें परिसरात साफसफाई करुन राबविण्यात आले. यामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षरित्या सहभाग घेऊन पोलीस अंमलदारांसोबत मिळुन पोलीस मुख्यालय परिसरात स्वच्छता केली. तसेच सदर स्वच्छता उपक्रमाचे महत्व गडचिरोली जिल्ह्यातील सर्व जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी गडचिरोली पोलीस दलातर्फे पोलीस कवायत मैदान ते इंदिरा गांधी चौक पर्यंत बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण ३०० पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला. तसेच जिल्ह्यातील जनसामान्य जनतेने या स्वच्छता उपक्रमात आपला सहभाग नोंदवून उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाप्रसंगी अपर पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्वच्छतेचे महत्व पटवुन सांगीतले व आपल्या सभोवताल स्वच्छता राखणे ही आपली नैतीक जबाबदारी आहे. तसेच आपले शरीर निरोगी राहावे व आपल्या आजुबाजुच्या परिसरात रोगराई निर्माण न होऊ देता प्रत्येकजणांनी आपले घर व घराच्या आजुबाजुचे परिसर दररोज स्वच्छ करावा, असे सांगीतले.कार्यक्रमास पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अहेरी यतिश देशमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी कुरखेडा साहील झरकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पेंढरी मयुर भुजबळ हे उपस्थित होते. यशस्वीतेसाठी सर्व शाखांचे प्रभारी अधिकारी व सर्व अंमलदार यांनी अथक परिश्रम घेतले.

## जेष्ठांच्या अनुभवातून आलेले विचार सक्षम व प्रगत समाजनिर्मितीसाठी पोषक-आ.किशोर जोरगेवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ज्येष्ठांचा सन्मान व त्यांच्याप्रती आपल्या मनात असलेला आदर व्यक्त करण्यासाठी आणि वडीलधार्यांच्या कर्तुत्वाला संबोधित करण्यासाठी जागतीक ज्येष्ठ नागरिक दिन हा दिवस साजरा केला जातो. जेष्ठांच्या विचारांची समाजाला गरज आहे. जेष्ठांच्या अनुभवातून आलेले विचार सक्षम, सुसंस्कृत आणि प्रगत समाज निर्मितीसाठी पोषक आहेत असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने रामनगर येथील ज्येष्ठ नागरिक संघ येथे स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष तथा जागतीक ज्येष्ठ नागरिक दिन व वयाचे ७५ वर्ष वर्ष पूर्ण झालेल्या ज्येष्ठांच्या अमृत महोत्सवी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उद्धाटक म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमाला डॉ. विकास आमटे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष महादेवराव पिंपळकर, गोपाळराव सातपूते, केशवराव जेनेकर, आसेगावकर,



वसंतराव मुसळे, ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष पंढरीनाथ गौरकार, सचिव माणिकराव गोहोकार, सहसचिव लक्ष्मणराव धोबे, कोषाध्यक्ष वसंतराव आवारी, परशुराम कापतडे, डॉ. चंपतराव नांदे, आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी पूढे बोलताना ते म्हणाले की, कोणत्याही क्षेत्रात जेष्ठांच्या अनूभवी मार्गदर्शनाशिवाय यशस्वी वाटचाल करणे शक्य नाही. जेष्ठांचे विचार आणि सूचना या अमुल्य असून त्या विचारात घेतल्या गेल्या पाहिजे, समाजानेही त्यांना योग्य वागणून दिली पाहिजे त्यांच्या सूचनांची दखल घेतली पाहिजे. आपआपल्या क्षेत्रात कामाच्या व्यस्ततेत जगत असतांना आतील कलागुण लुप्त होतात. मात्र निवृत्ती नंतर दळलेल्या कलागुणांना पून्हा पुनर्जीवित करण्याचे काम जेष्ठ नागरिक संघ करत आहे. जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने चांगल्या समाज निर्मितीच्या दिशेने कौतुकास्पद काम केल्या जात आहे. ज्येष्ठ नागरिक संघ निवृत्ती नंतर ज्येष्ठांसाठीचे हक्काचे व्यासपीठ असल्याचे ते यावेळी म्हणाले.ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने ज्येष्ठांना एकत्रीत आणून त्यांचे विचार, अनुभव समाजापर्यंत पोहचविण्याचे काम केल्या जात आहे. ज्येष्ठांकडे विचारांची मोठी ठेवी आहे. त्यांच्या विचारांचा सन्मान झाला पाहिजे. त्यांनी मांडलेले समाजोपयोगी विचार समाजानेही स्वीकारले पाहिजे. आज ७५ वर्ष पूर्ण झालेल्या ज्येष्ठांचा सत्कार केल्या जात आहे. हा सत्कार आपण विविध क्षेत्रात दिलेल्या योगदानाची पावती असल्याचेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते ७५ वर्ष पुर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भीम पँथरचे जिल्हाध्यक्ष सुरज पुल्लरवार यांचा आम आदमी पक्षात प्रवेश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील भीम पँथरचे जिल्हाध्यक्ष सुरज पुल्लरवार यांनी आम आदमी पक्षात प्रवेश केला. आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार यांच्या नेतृत्वाखाली शंकर सरदार यांच्या उपस्थितीत त्यांनी पक्षात प्रवेश केला.

यावेळी बोलताना सुरज पुल्लरवार म्हणाले की, आम आदमी पक्ष हा एकच पक्ष आहे जो खऱ्या अर्थाने जनतेच्या हितासाठी काम करतो. दिल्ली, पंजाब आणि गोवा या राज्यांमध्ये आम आदमी पक्षाने केलेल्या कामांमुळे मी प्रभावित झालो आहे. त्यामुळे मी आम आदमी पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार म्हणाले की, सुरज पुल्लरवार यांचे आम आदमी पक्षात स्वागत आहे. ते एक अनुभवी आणि कार्यक्षम आहेत. त्यांचा पक्षात प्रवेश आम आदमी पक्षाला अधिक मजबूत करेल.



# भारताला मिळालेलं कणखर नेतृत्व – लाल बहादुर शास्त्री

महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांची जशी जन्मतारीख एक आहे, तरीही त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०४ साली उत्तरप्रदेशातील मुगलसराई या गावी झाला. तसे दोघे ही समविचारी, विचारात कुठेही फारकत नव्हती. महात्मा गांधींच्या विचारांचा भारदस्त पगडा शास्त्रींच्या खोलवर मनावर रुजला होता. महात्मा गांधी प्रमाणेच शास्त्री जेवढे मृदु होते, तेवढेच निश्चयी देखील होते. महात्मा गांधीचे नांव ऐकले होते, परंतू प्रत्यक्षात बघण्याचा योग शास्त्रींजीना १९१६ साली झाला. त्यावेळी ते आफ्रिकेतून नुकतेच भारतात परत आले होते.१९३० मध्ये, महात्मा गांधी यांनी दांडीयात्रा केली आणि मिठाचा कायदा मोडला. या प्रतिकात्मक संदेशाने संपूर्ण देशात क्रांती आली. लाल बहादूर शास्त्री पेटून उठले आणि स्वातंत्र्य लढयात त्यांनी स्वत:ला झोकून दिले. त्यांनी अनेक विद्रोही मोहिमांचे नेतृत्व केले आणि एकूण सात वर्षे ब्रिटीश तुरुंगवासात घालवली. स्वातंत्र्याच्या या संग्रामाने ते अधिक परिपक्व झाले. लाल बहादूर शास्त्री यांना परकीयांच्या गुलामीमधून देशाला मुक्त करण्याच्या लढयात रुची निर्माण झाली. भारतात ब्रिटीश राजवटीला पाठिंबा देणाऱ्या भारतीय राजांची महात्मा गांधी यांनी केलेल्या निंदेमुळेते अत्यंत प्रभावित झाले. तेव्हा पासून राष्ट्रीय स्तरावर काहीतरी करण्याबाबतची प्रक्रिया त्यांच्या मनात घोळू लागली. महात्मा गांधीजींनी देशवासियांना असहकार चळवळीत सहभागी होण्याचे आवाहन केले, त्यावेळी लाल बहादूर शास्त्री सोळा वर्षांचे होते. गांधीजींच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून शिक्षण सोडून देण्याचा विचार एकदा त्यांनी केला. त्यांच्या कुटुंबियांनी त्यांचा हा निर्णय चुकीचा असल्याचे सांगून त्यांना रोखण्याचा खूप प्रयत्न केला, मात्र ते प्रयत्न असफल ठरले. लाल बहादूर शास्त्री यांचा निर्धार ठाम होता. त्यांच्या निकटच्या व्यक्तींना माहित होते की एकदा निर्णय घेतला की ते तो कधीही बदलणार नाहीत, कारण बाहेरुन मृदू वाटणारे शास्त्री आतून एखादया खडका सारखे कणखर होते.ब्रिटीश राजवटीच्या विरोधात स्थापन करण्यात आलेल्या अनेक राष्ट्रीय संस्थांपैकी एक वाराणसीतील काशी विद्यापीठात ते सामील झाले. येथे अनेक महान विद्वान आणि देशभक्तीचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पडला. विद्यापीठाने त्यांना दिलेल्या पदवीचे नाव शास्त्री होते. मात्र लोकांच्या मनात त्यांच्या नावाचा एक भाग म्हणून शास्त्री हे नाव कोरले गेले.स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस जेव्हा सत्तेवर आली, त्यापूर्वीच राष्ट्रीय संग्रामातील नेत्यांना नम्र आणि विनित लाल बहादूर शास्त्री यांचे महत्त्व लक्षात आले होते. १९४६ मध्ये काँग्रेस सरकार स्थापन झाले, तेव्हा या छोटया डायनॅमो ला देशाच्या कारभारात रचनात्मक भूमिका पार पाडण्यासाठी सांगण्यातआले. त्यांना त्यांच्या उत्तर प्रदेश राज्याचे संसदीय सचिव नियुक्त करण्यात आले आणि लवकरच ते गृहमंत्री पदावर आरुढ झाले. त्यांची कठोर मेहनत करण्याची क्षमता आणि त्यांची कार्यक्षमता उत्तरप्रदेशात एक लोकोक्ती बनली. १९५१ मध्ये ते नवी दिल्लीत आले आणि केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वेमंत्री, वाहतूक आणि दळणवळण मंत्री, वाणिज्य आणि उद्योग मंत्री, गृहमंत्री आणि नेहरुंच्या आजारपणात बिन खात्याचे मंत्री म्हणून काम पाहिले. त्यांची प्रतिष्ठा निरंतर वाढतच होती. रेल्वे मंत्रालयाची जबाबदारी असतांना त्यांच्या कारकीर्दीत रेल्वे अपघातात अनेक जणांना जीव गमवावा लागल्यामुळे त्यांनी स्वत:ला जबाबदार ठरवत रेल्वे मंत्री पदाचा राजीनामा दिला. देश आणि संसदेने त्यांच्या अभूतपूर्ण निर्णयाची प्रशंसा केली. तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी या घटनेबाबत संसदेत बोलताना लाल बहादूर शास्त्री यांची इमानदारवृत्ती आणि उच्च आदर्श मूल्यांची प्रशंसा केली. ते म्हणाले की शास्त्री यांचा राजीनामा मी स्वीकारत आहे, कारण यामुळे घटनात्मक मर्यादे मध्ये एक उदाहरण कायम राहील. जे काही घडले त्याला शास्त्री जबाबदार नाहीत. रेल्वे अपघातावरील दीर्घ चर्चेला उत्तर देतांना लाल बहादूर शास्त्री म्हणाले कदाचित माझी उंची कमी असल्यामुळे तसेच नम्र असल्यामुळे लोकांना वाटत असावं की कणखर होऊ शकत नाही. जरी मी शारीरिक दृष्टया धडधाकट नसलो तरी मला वाटते की मी आतून इतका कमकुवत ही नाही.आपल्या मंत्रालयीन कामकाजा दरम्यान, काँग्रेस पक्षाशी संबंधित व्यवहाराकडे ही त्यांनी लक्ष दिले आणि त्यात भरीव योगदानही दिले. १९५२, १९५७ आणि १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकांमधील पक्षाच्या निर्णायक आणि जबरदस्त यशामध्ये त्यांचे संघटनात्मक कौशल्य आणि एखाद्या गोष्टीची जवळून पारखण्याची त्यांची क्षमता यांचे मोठे योगदान होते. तीसहून अधिक वर्षे आपल्या समर्पित सेवे दरम्यान लाल बहादूर शास्त्री निष्ठा, क्षमतेसाठी जनमानसांत लोकप्रिय झाले. नम्र, दृढ आणि जबरदस्त आंतरिक शक्ती असलेले शास्त्रीजी लोकांची भावना समजून घेणारे खऱ्या अर्थाने त्यांचे मित्र बनले. त्यांनी आपल्या दूरदर्शीवृत्तीने देशाला विकासाच्या मार्गावर नेले. लाल बहादूर शास्त्री यांच्यावर महात्मा गांधींच्या राजकीय शिकवणीचा मोठा पगडा होता. आपले गुरु महात्मा गांधीच्या शैलीत ते एकदा म्हणाले. कठोर मेहनत ही प्रार्थनेच्या समान आहे.महात्मा गांधी यांची परंपरा कायम राखणारे लाल बहादूर शास्त्री यांनी भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधित्व केले.लाल बहादूर शास्त्रींनी आपल्या कार्यकाळात अभ्यास दौरा समजून अनेक देशांना भेटी देवून दूरावा असलेल्या देशात सामंजस्य निर्माण केलं. ते ज्या ठिकाणी जात त्या त्या ठिकाणी आपल्या मृदूपण निश्चयी शब्दांनी ते आपली छाप पाडत आणि आपल्या देशात कोणत्या उणीवा आहेत आणि त्या देशापासून आपल्याला काय शिकण्या सारखे आहे. त्याचा आढावा घेवूनच ते स्वदेश परतल्यावर कामाला लागले. २७ मे १९६४ ला जवाहरलाल नेहरुंचे निधन झाल्यानंतर पंतप्रधानाची सुत्रे हाती घेतल्या बरोबर देशाची धुरा सांभाळण्याची जबाबदारी लालबहादूर शास्त्री यांचेवर आली. माणसाचे शील आणि निश्चय किती प्रभावशाली असू शकतो हे शास्त्रींनी स्वकर्तृत्वातून देशाला दाखवून दिले.इतक्या अल्पावधीत शास्त्री जातील असे कोणाच्याही मनी विचारआला नव्हता. त्यामुळे सर्व गर्भगळीत झालेत, शास्त्री गेलेत आणि देश पोरका झाला. एकाग्रतेचे भान ठेवूनच कोणताही एखादा निर्णय घेते वेळी ते कठोर भुमीका घ्यायचे. परंतू तेवढाच त्यांचा स्वभाव शांत, धीर, गंभीर म्हणूनच त्यांना शांती पुरुष नांवाने संबोधण्यात येत होते. शास्त्रींचे संपुर्ण जीवन हिच एक आदर्श आचारसंहिता होय. शास्त्रींच्या अंगी अनेक गुणांचा प्रत्यय आजपर्यंत अनेकवेळा आला असला तरी यावा मनमुर्तीने जे अतुल धैर्यशाली, विलोभनीय सामर्थ्यानिशी मार्गदर्शन भारताला केले त्याने सारे जग स्तिमित झाले होते. भारताची शान आणि मान जगात ताठरमानेने उंचावली.सन् १९६५ ला पाकिस्तानने भारत सिमेवर आक्रमण केले. त्यावेळी त्यांनी धैर्याने व तेवढयाच ताकदीने युध्दाला सामोर गेले आणि सीमेवर लढणाऱ्या सौनिकांना सिमेवर स्वत: जावून त्यांनी प्रोत्साहन देण्याकरीता 'जय जवान, जय किसान' नारा देवून विजयपताका देशावर फडकावली. युनोने युध्दबंदीचा आदेश दिला, रशियाचे पंतप्रधान कोसिजीन यांनी शास्त्रींजींना आणि अयुबखानना वाटाघाटीसाठी ताश्कंदला बोलावले. तेथे वाटाघाटी, चर्चा होऊन १० जानेवारी, १९६६ ला शास्त्री आणि आयुबखान यांनी कोसिजीनना साक्षी ठेवून करारावर सहया केल्या. तेंव्हाच दोन्ही देशात समन्वय साधण्याकरीता दिलजमाई म्हणून आंतर्राष्ट्रीय कीर्तीचा न भूतो, न भविष्य असा तो 'ताश्कंद करार' करण्यात आला. दुसऱ्याच दिवशी रेडीओ वरुन बातमी प्रसारीत झाली की, लाल बहादुर शास्त्री यांचे निधन अचानक झाल्याने देश हादरुन गेला.देशातला सर्वोच्च पुरस्कार भारतरत्न शास्त्रीजींना प्रथमत: मरणोपरांत १९६६ ला देण्यात आला. 'विजयघाट' याठिकाणी अंतिमसंस्काराने शास्त्रीजींना शेवटची सलामी देण्यात आली. अशा या महान देशभक्ताला ज्यांनी या देशावर शेवटच्या क्षणापर्यंत जिवापाड प्रेम केले त्यांच्या जन्मदिनी भावपूर्ण अभिवादन !



प्रविण बागडे,नागपूर
मो : ९९२३६२०९१९



## हवामान बदलाचे परिणाम

यंदा प्रथमच धुळीच्या वादळाचा फटका महाराष्ट्राला बसला. आखात - पाकिस्तानसह पश्चिमी चक्रावात आखाती देशांतून पाकिस्तान, राजस्थान, पश्चिम उत्तर प्रदेश, पश्चिम मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर महाराष्ट्र, जळगाव, चोपडा, पश्चिम महाराष्ट्र, पुणे, नाशिक, नगर, सातारा, मुंबई, मराठवाड्यातील परळी वैजनाथ, परभणी, पाथ्री, सोलापूर जिल्ह्याचा भाग या संपूर्ण परिसरात ता. २० मार्च रोजी सुरू झालेली धुळीची वादळे दिसून आली.

आकाशातील हवा भुरकट, दुहीसारखी (ज्यास इंग्रजीत हेज' असे म्हणतात), तसेच त्यामध्ये बाष्पाचे अतिसूक्ष्म कण आणि नेहमीपेक्षा पाच ते सहा पट अधिक प्रमाणात धुळीचे कण असल्याचे दिसून आले. धुळीच्या कणांचे प्रमाण हवेत २०० पी.पी.एम. इतपत असते (इंग्रजीत एरिसॉल' म्हणून संबोधतो) ते वाढून १२०० पी.पी.एम.पर्यंत वाढल्याने जळगाव आणि चोपडा भागात १००० मीटर अंतराच्या पुढील भाग दिसत नव्हता; तसेच मुंबई शहरात ते २१ मार्चला अधिक प्रखर होते. तेथे १०० मीटर अंतराच्या पुढील भाग स्पष्ट दिसत नव्हता.

पृथ्वीभोवती असलेल्या हवेला विशिष्ट दाब असतो. तो मिलीबार किंवा हेप्टापास्कलमध्ये मोजला जातो. वातावरणात सूर्यप्रकाशाची किरणे पडताच पृथ्वीचे तापमान वाढण्यास सुरवात होते. पृथ्वीच्या जवळचे हवेचे थर तापतात आणि त्यावरील थर थंड असतात, त्यामुळे तेथे हवेचा दाब जास्त असतो. नैसर्गिकपणे हवा वरून खाली वाहते; मात्र त्या थरात काही उंचीवर थंड हवा असल्याने ती हवा पुन्हा आणखी खालच्या दिशेने वाहते. यालाच एअर इन्व्हर्जन' म्हणतात. त्यातून धुळीचे कण मोठ्या प्रमाणात पृथ्वीच्या पृष्ठभागावरील हवेच्या थरात येऊन लोंबकळत राहतात. राजस्थान, गुजरात आणि उत्तर महाराष्ट्र प्रदेशात हवेचा दाब कमी झालेला होता, त्यामुळे आखाती प्रदेशाकडून हवेबरोबर वाहत येणारे धुळीचे कण हवेत तरंगत राहिले.

मुंबईभोवती हवेचा दाब १०१० हेप्टापास्कल होता; तर मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेशकडे तो १०१२ हेप्टापास्कल होता. त्यामुळे हवा जास्त दाबाकडून कमी दाबाकडे वाहत राहिली. या भागात धुळीचे कण मोठ्या प्रमाणात जमा झाले. राजस्थानात मार्च महिन्यात अशी धुळीची वादळे सतत होत असतात. त्याचा प्रभाव आजपर्यंत मुंबई आणि महाराष्ट्रापर्यंत होत नव्हता. धुळीसोबत हवेतील बाष्पही लोंबकळत राहिल्याने हेज'चे वातावरण अनुभवण्यास मिळाले. ते दिवसभर टिकून राहिले.

२१ मार्चला सूर्य विषुववृत्तावर असतो. त्यापुढे त्याचा प्रवास उत्तर गोलार्धाच्या दिशेने म्हणजेच कर्कवृत्ताच्या दिशेने होतो. त्या दिवशी मार्च महिन्यातील किमान तापमानाची नोंद झाली. धुळीमुळे पिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन रोग-किडींचा प्रादुर्भाव वाढेल, तसेच मानवामध्ये श्वसनाचे आजार, स्वाइन फ्लूचे प्रमाण वाढणे, फुफ्फुसाचे आजार आणि अस्थमिक विकार वाढू शकतात. मार्च महिन्यात अशा प्रकारे दूषित हवामान होण्याचे हे पहिलेच उदाहरण असावे.


९ फेब्रुवारी रोजी शून्यानजीक पोचलेल्या नीचांकी तापमानामुळे व आठवडाभर अतिथंडीने द्राक्ष पिकाचे मोठे नुकसान झाले. राज्यातील नाशिक, सांगली, सोलापूर, नगर, पुणे या द्राक्ष उत्पादक जिल्ह्यांतील ३० टक्के द्राक्षांची काढणी अद्याप बाकी आहे. गतवर्षाच्या तुलनेत दर ३० ते ४० टक्क्यांनी कमी आहेत. या वर्षी डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून थंडी वाढण्यास सुरवात झाली. जानेवारी महिन्यात किमान तापमान सहा ते सात सेल्सिअसच्या दरम्यान राहिल्याने सफेद वाणांच्या फुगवणीवर व साखर निर्मितीवर विपरीत परिणाम झाला, त्यामुळे द्राक्ष हंगामही लांबला.

ज्या भागात संजीवकांचा अतिवापर झाला, त्या भागातील बागा अतिथंडीला प्रामुख्याने बळी पडल्याचे दिसून आले. गोडीवरही थंडीचा परिणाम झाला. कमी गोडीमुळे बिहार, दिल्ली, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, जम्मू-काश्मीर येथील बाजारपेठेतील मागणी घटली. परदेशात ढाका (बांगलादेश), काठमांडू (नेपाळ), मलेशिया, हाँगकाँग, दुबई, रशिया या देशांत काळ्या रंगाच्या द्राक्षांना चांगला प्रतिसाद लाभला; मात्र युरोपमध्ये इंग्लंड, जर्मनी येथे दर वर्षीच्या तुलनेत ३० टक्के मालाचा उठाव झाला. द्राक्षमालाच्या निर्यातीवर या वर्षी मोठा परिणाम झाला. हा सर्व हवामान बदलाचाच परिणाम असल्याने शेती क्षेत्रावर आणि द्राक्ष बागायतदारांच्या अर्थकारणावर होणाऱ्या परिणामाचा विचार शासन पातळीवर होणे गरजेचे आहे.

मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात तापमानात घट झाल्याने कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागातील हिरवेगार उसाचे पीक वाळू लागले. आजरा तालुक्यातील वाटंगी, सिरशिंगी, एमेकोड, किणे, शेळप या परिसरातील सुमारे १०० एकर क्षेत्रावरील ऊस पिकास मोठा फटका बसला. थंडीमुळे या परिसरातील खोडवा पिकाची वाढ खुंटल्याचे आढळून आले. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात किमान तापमानात मोठे चढ-उतार पाहावयास मिळाले. हवा कोरडी आणि थंड वारे यामुळे उसाची सुरळी वाळणे, पानावर डाग पडणे अशा स्वरूपाचे परिणाम दिसून उसाचे पीक वाळू लागले. साधारणपणे १ मार्च ते ४ मार्च या कालावधीत किमान तापमान ८.४ ते ९.५ सेल्सिअस म्हणजेच १० सेल्सिअसपेक्षा कमी होते. यावरून ४८ ते ७२ तास हवेचे दिवसाचे व रात्रीचे तापमान कमी राहिल्यास असे परिणाम होत असून, ऊस पीक किमान तापमानास संवेदनक्षम असल्याचे अनुमान निघते. किमान तापमानास संवेदनक्षम असणारी ही दोन्ही पिके आहेत. या दोन्ही पिकांवर थंडीचा मोठा परिणाम झाल्याने बाजारात पिकांचे उत्पादन दिसत नाही. यावरून थंड हवामानाचा वेलवर्गीय पिकांवर मोठा परिणाम होतो हेच अनुमान निघते. गेले दोन महिने काकडीचे थंड हवामानामुळे नुकसान झाले. बाजारात काकडीचा मागणीनुसार पुरवठा होत नाही. थंडीमुळे लागवड केलेले बियाणे अथवा रोपे वाढू शकली नाहीत.या वर्षी कोकणातील हापूस आंब्यावर फुलकिडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला असून, मोहराचे नुकसान झाले आहे. किडीची पैदास वाढण्यास हवामान अनुकूल ठरले असून, देशावर आणि मराठवाड्यात या किडीचा प्रादुर्भाव वाढणे शक्य आहे, त्यासाठी उपाययोजना करावी.

## गांधीजी-शास्त्रीजींच्या पश्चात आपण त्यांचे काय केले...?

आज राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीचा संयुक्त दिवस! या दोन्हीं महापुरुषांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या महान कार्याला आणि स्मृतींना विनम्र अभिवादन! आज ज्या दोन महापुरुषांची जयंती सर्वत्र देश आणि राज्यभर संपन्न होत आहे, त्यांच्या पश्चात आपण त्यांच्या मूल्य-तत्व-कार्यप्रणालीचे काय केले? यावर कृतीशील चिंतन-मंथन होणे काळाची गरज आहे. अलीकडच्या काळात राजकारण मोठ्या झपाट्याने बदलले आहे. राजकारणातील सुचिता पार धुळीला मिळाली आहे. एक काळ होता जेंव्हा सामान्य माणूस राजकारणी व्यक्तीकडे मोठ्या सन्मानाने पहायचा! हा नेता माणूस नक्कीच आपल्या भागाचे, राज्याचे आणि देशाचे भले करील(!) असा आशावाद सामान्य माणसांच्या मनात असायचा. मात्र अलीकडच्या दोन दशकात सर्व काही बदलले आहे. वर्तमान राजकारणी लोकांनी तर पक्षनिष्ठा, विचार प्रणाली, तत्वे इत्यादी आदर्श बाबी केवळ पुस्तकात वाचायला शिल्लक ठेवल्या आहेत! जवळपास सर्वच राजकारणी लोकांवरचा सामान्य माणसाचा विश्वास उडाला आहे. कोण काय करतोय? कोण कुठे आहे? कोण किती खरं बोलतोय? कोण कुणाला उजागर-चोरून भेटतोय? याचा लेखाजोखा सामान्य माणसाजवळ आहे. परिणामी आज माणसे राजकारणी माणसांना केवळ समोरासमोर सन्मान देतात आणि बाजूला सरकले की; हा किती बदफैली, भ्रष्ट, व्यभिचारी, वाळू चोर, गिट्टी चोर, रस्ते चोर, संडास चोर, गोरगरिबांची शेती चोर, सरकारचाटॅक्सचोर, वीज चोर आहे याची मोठ्या चवीने चर्चा करतात. आज गांधीजी आणि शास्त्रीजींच्या प्रतिमेला पुष्पहार घालणारे हात कसे आहेत? हा सुद्धा विचार नक्की व्हायला हवा!हे युवकांनो, आपली विरासत म्हणजेच आपला देदीप्यमान इतिहास नीट समजून घ्या! तुमच्या हाती उद्याच्या उज्वल भविष्याची कमान आहे. तुम्हीच उद्याच्या भारताचे शिल्पकार आहात! आपण आपले ऐतिहासिक महापुरुष आणि त्यांचे कार्य व्यवस्थित समजून घेतले पाहिजे. कुणी मिडीयावर एखाद्या महापुरुषांविषयी चुकीची पोस्ट केली असेल तर आपण त्याच्या मुळाशी जाऊन, विवेक जागृत ठेवून ती पोस्ट प्रसारित करावी. त्यानंतर त्यावर आपली प्रतिक्रिया दिली पाहिजे अन्यथा तिला दुर्लक्षित करायला हवे. तुमच्या माझ्या हातात मिडिया नावाचा हा महासागर असून यातून आपण अगदी चातकासारखे सातत्याने ज्ञानामृताचे कण वेचले पाहिजे. असे झाल्यास कुणीही तुमच्या तारुण्य शक्तीचा गैरवापर करणार नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात आणि एकूणच देशाच्या उभारणीत मोलाचे योगदान राहिले आहे. लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदि धुरिणांचे योगदानही दुर्लक्षून चालणार नाही, परंतु आज गांधी-शास्त्री यांची जयंती असल्यामुळे त्यांच्यावर कटाक्ष टाकणे अगत्याचे आहे. गांधीजींनी व्रतस्थ जीवन जगतांना उपोषण, असहकार, सत्य, अहिंसा इत्यादी आत्मिक बाबींचा इंग्रज सत्तेच्या विरोधात मोठ्या चतुराईने वापर केला. याचा परिणाम इंग्रजांना आपला भारत देश स्वतंत्र करावा याची जाण झाली. गांधीजींनी शिक्षण संदर्भात नयी तालीम हा अत्यंत मूलगामी, कृतीशील कार्यक्रम आखला आणि तो प्रत्यक्ष सिद्ध करून दाखवला. यामध्ये शासनाने ७ ते १४ वर्षापर्यंत नि:शुल्क आणि अनिवार्य मुलभूत शिक्षण द्यावे. स्वावलंबी आणि मातृभाषेत शिक्षण द्यावे. पाचवी पर्यंत सर्वांना





एकच शिक्षण द्यावे. बालकांना शेती, ग्रामीण उद्योग, हस्तकला व्यवसाय, संगीत, चित्रकला, सामाजिक अध्ययन, सामान्य विज्ञान आणि शारीरिक शिक्षण इत्यादी गोष्टी अनिवार्य करून शालेय काळात बनवलेल्या कलाकृतींना बाजारात विकून शाळेला उत्पन्न मिळवून द्यावे. राजर्षी शाहू महाराजांच्या राज्यांत लहान मुलांना शिक्षण मोफत दिले जात असे आणि जे पालक आपले लेकरू शाळेत पाठवणार नाहीत त्या कुटुंबाला १ रुपया दंड लावला जायी. गांधीजींनी सांगितलेली नयी तालीम आणि शाहू महाराजांचे आदर्श शिक्षण आपले राज्य सरकार अंगीकारते आहे का? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. या उलट आपल्या शासनाने वीस पेक्षा कमी पटाच्या सरकारी शाळा बंद करण्याचा घाट घातला असून बाकी जि.प.च्या शाळा कंत्राटदाराकडून चालवल्या जातील असा आदेश काढला आहे. शिक्षकाची भरती सुद्धा कंत्राटी पद्धतीने केली जाणार आहे. शिक्षणात ही एक प्रकारची वेठबिगारी येणार म्हणायचे का? निश्चितच हे अधोगतीचे आणि शिव-फुले-शाहू-गांधी-आंबेडकर यांच्या महाराष्ट्राला शोभणारे नाही. माणसाच्या सर्वांगीण विकासाची मुलभूत गोष्ट म्हणजे शिक्षण आणि तिच बाब जर कंत्राटी आणि महाग करून ठेवल्यास विकसित देशाचे स्वप्न कुणाच्या जीवावर पहायचे? आपण सत्तेत आहात म्हणजे इथली मूलगामी शिक्षण व्यवस्था धुळीस मिळवणार आहात का? इथला सामान्य, गाव-खेडे, तांडा-वस्ती, गोर-गरीब, ऊसतोड कामगारांच्या मुलांनी पिढ्यानपिढ्या कोयते घेऊन अजीवन ऊसतोड करत गुलामीच करायची का? शिकलेले लोक प्रश्न विचारतात म्हणून पुन्हा जनता अशिक्षितच ठेवायची आहे का?दुसरीकडे स्वतंत्र भारताच्या उभारणीत लाल बहादूर शास्त्री यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. शास्त्रीजी वयाच्या अकराव्या वर्षी महात्मा गांधीजीसोबत भारतीय स्वातंत्र्य लढ्यात उतरले. चंपारण्य सत्याग्रह,रौलेट ॲक्ट,जालियानवालाहत्याकांड आदींचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय सहभाग घेतला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर केंद्रात रेल्वे मंत्री, विदेश मंत्री आणि गृह मंत्री इत्यादी महत्वपूर्ण खाती सांभाळली. १९६४ साली नेहरूंचे निधन झाले आणि शास्त्रीजी भारताचे दुसरे पंतप्रधान झाले. ते सत्तेवर आल्याबरोबर पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले आणि त्यात भारताने विजय मिळवला. यावेळी शास्त्रीजींनी 'जय जवान, जय किसान' हा नारा देऊन श्वेत क्रांती आणि हरित क्रांती घडवून आणली. यातून शेतकरी स्वावलंबी करण्याचे प्रयत्न झाले. पंजाब, हरियाना आणि उत्तर प्रदेशात गव्हाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात आले. मरणोपरांत त्यांना भारतरत्न सन्मानाने गौरवान्वित करण्यात आले.आज हे दोन्ही महापुरुष जाऊन अनेक दशके लोटली आहेत. तरीही त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा ठसा समाजमनावर खोलवर रुजलेला आहे. विद्यमान राजकारणी लोकांनी या त्यागी लोकांचा आदर्श समोर ठेवून राज्य-देश पुढे न्यायला हवे. शिक्षणाचे कंत्राटीकरन हा महाराष्ट्र शासनाचा निर्णय लोकांना अजिबात रुचला नाही. गांधीजींची आणि शास्त्रीजींची जयंती साजरी करतांना गांधीजि आणि शाहू महाराजांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन समोर ठेवावा लागेल. दुसरीकडे 'जय जवान' म्हणतांना सैनिक कंत्राटी पद्धतीने भरले जाऊ नयेत. 'जय किसान' म्हणतांना शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळालाच पाहिजे. संपत्ती नक्की कमवा परंतु एखाद्या व्यक्तीने किती संपती कमावली म्हणजे तो महान होईल? त्यासाठी प्रत्येक आमदार-खासदाराने आपापल्या मतदार संघातील छोट्या छोट्या शाळा दत्तक घेऊन आपली थोडीशी कमाई तिथे देऊन दानत्व दाखवावे. आपल्या भागातील शेतकरी-कष्टकरी लोकांच्या समस्या जाणून त्याची सोडवणूक करावी. असे केल्यास जनमाणसात मलीन-भ्रष्ट झालेली प्रतिमा उजळून गोरगरीब जनतेचे आशीर्वाद मिळतील! निवडणुकीच्या वेळी दारू-मटन वाटण्याची दुर्दैवी वेळ येणार नाही! पहा जमतंय का? जय जवान! जय किसान! जय विज्ञान!



प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये
मो.९१५८०६४०६८

# आशियाई स्पर्धेत अविनाश साबळे याने गोल्डमेडलवर कोरलं नाव




**हांगझोऊ–**चीनमध्ये सुरु असलेल्या आशियाई स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील बीडच्या सुपुत्राने सुवर्णमय कामगिरी केली आहे. अविनाश साबळेने आशियाई स्पर्धेत इतिहास रचला. आशियाई क्रीडा स्पर्धेत त्याने ३ हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात गोल्डमेडल जिंकले. अविनाशच्या या यशामुळे भारतासाठी आणखी एका गोल्डमेडलची भर पडली आहे.गेल्या महिन्यात बुडापेस्ट येथे झालेल्या जागतिक चॅम्पियनशिपमध्ये तीन हजार मीटर स्टीपलचेसमध्ये अविनाश हा ७ व्या क्रमांकावर राहिला होता. त्यामुळे त्या कामगिरीवर अविनाश साबळे देखील स्वत: खुश नव्हता. मात्र, अविनाशने यंदाच्या आशियाई क्रीडा स्पर्धेत नव्या उमेदीन सहभाग घेतला आणि आज सुवर्णपदाकवर अखेर नाव कोरलच.अविनाश साबळे यानं आजच्या स्पर्धेपूर्वी यंदाच्या हगांमातील हांगझोऊ येथील आशियाई क्रीडा स्पर्धा ही अखेरची स्पर्धा असल्याचं म्हटलं होतं. मी राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करण्यासाठी धावत नसून हांगझोऊ मधील स्पर्धेत चांगली कामगिरी करण्याचा मानस असल्याचं तो म्हणाला होता. मी आशियाई क्रीडा स्पर्धेत चांगली कामगिरी करण्यासाठी धावणार आहे. यासाठी प्रशिक्षण घेतलं असून चांगली कामगिरी करुन सुवर्णपदकावर नाव कोरणार असा निर्धार त्याने केला होता.अखेर अविनाश साबळेनं आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकावर नाव कोरण्याचं स्वप्न पूर्ण केले आहे. त्याने ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये सुवर्णपदकावर नाव कोरलं आहे. याशिवाय तो ५ हजार मीटर क्रीडा प्रकारात देखील प्रयत्न करणार आहे. ३००० मीटर स्टीपलचेस मध्ये सुवर्णपदक पटकावण्याचा विश्वास अविनाश साबळे यानं स्पर्धेपूर्वी व्यक्त केला होता. तो त्यानं सत्यात उतरवला आहे.अविनाश साबळे महाराष्ट्रातील मूळचा बीडचा आहे. वयाच्या सहाव्या वर्षापासून अविनाश धावण्याचा सराव करत आहे. १२वी चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर अविनाश भारतीय लष्कराच्या ५ महार रेजिमेंटमध्ये दाखल झाला होता. दरम्यान, आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं आता चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे. १२ सुवर्ण, ११ रौप्य आणि १६ कांस्यपदकांसह भारताने आतापर्यंत ४४ पदकं मिळवली आहेत.

# ससून रुग्णालय परिसरात दोन कोटीचे अमली पदार्थ जप्त

## एका मोठ्या अमली पदार्थ तस्करासह तिघांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**पुणे–**पुण्यातील प्रसिद्ध ससून रुग्णालय परिसरात अमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करून तब्बल दोन कोटी रुपये किंमतीचे मेफेड्रोन (एमडी)हा अमली पदार्थ जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एका मोठ्या अमली पदार्थ तस्करासह तिघां आरोपीना ताब्यात घेतले आहे.

शासकीय ससून रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर झालेल्या या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. या रुग्णालयातील कैदी ठेवण्यात येत असलेल्या न्यायालयीन वार्डमध्ये हे दोन किलो ५५७ ग्रॅम अमली पदार्थ नेले जात होते अशी धक्कादायक माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याबाबतची गोपनीय माहिती मिळाल्यावर पुणे शहर गुन्हे अन्वेषण विभागाचे सहायक पोलीस आयुक्त



सतीश गोवेकर, अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुनील थोपटे व त्यांच्या पथकाने रुग्णालय परिसरात सापळा रचून तिघां आरोपीना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे एका पिशवीमध्ये संबधित अमली पदार्थ पोलिसांना मिळून आले आहे.याप्रकरणात अमली पदार्थ विक्रीतील मोठा तस्कर ललित पटेल याला पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्यासमवेत रुग्णालयातील कँटीनमध्ये काम करत असलेल्या एका कंत्राटी कामगारालाही ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्यामार्फत रुग्णालयात दाखल असलेल्या एका कैद्याकडे हे अमली पदार्थ पोचवले जात असल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे.नेमके हे अमली पदार्थ कोठून आणले जात होते, त्याचे पैसे कशाप्रकारे देण्यात होते, या तस्कर साखळीमध्ये पोलीस खात्या अंतर्गत कोणी कर्मचारी सहभागी आहे किंवा कसे याबाबतचा तपास अमली पदार्थ विरोधी पथकाकडून करण्यात येत आहे.

# उत्सव साजरा व्हायलाच हवा पण भान ठेवा;आनंदाची किंमत मोजावी लागते, कुठेतही आपलं चुकतंय–ठाकरे

**मुंबई–**महाराष्ट्रात गणोशोत्सव उत्साहात पार पडला. पण, कुठेतरी डीजे बंद करण्यास सांगितल्यानं मारहाण अथवा आवाजामुळे मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. यावरुन मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी चिंता व्यक्त केली आहे. कुठेतरी आपलं चुकतंय ह्याचा विचार करायला लावणारी गोष्ट नक्कीच आहे, असे राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.ट्वीटर अकाउंटवर राज ठाकरे म्हणाले की, सस्नेह जय महाराष्ट्र..! महाराष्ट्रातला गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडला, आणि तो पार पडावा ह्यासाठी ज्या प्रशासकीय यंत्रणा राबल्या त्यांचं मनापासून अभिनंदन. नेहमीप्रमाणे स्वतःच्या घरातील सण, सणाचा आनंद बाजूला ठेवून त्यांनी जे काम केलं ते नक्कीच प्रशंसेस पात्र आहे.मी आज ज्यावर बोलतोय त्याची पार्श्वभूमी नुकताच पार पडलेला महाराष्ट्रातील महाउत्सव आणि त्याचं बदलत चाललेलं स्वरूप हे आहे. गणपती असो, दहीहंडी असो की नवरात्रोत्सव असो, रामजन्माचा उत्सव असो की इतर हिंदू देवतांचे उत्सव असोत, ते ह्या देशात उत्साहाने साजरे व्हायलाच पाहिजेत. आणि त्यावर सरकारांनी जरी निर्बंध आणले तरी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने वेळेस सरकारशी संघर्ष केला आहे आणि ह्यापुढे पण गरज पडली तर करत राहू. आपल्या धर्मातील उत्सवांना विरोध करायचा आणि इतर धर्मातील उन्मादावर मौन बाळगायचं अशी एक जमात आपल्याकडे आहे, त्यांचा मुखभंग पण आम्हीच केला आहे. त्यामुळे धर्माभिमान इत्यादी गोष्टी आम्हाला कोणी शिकवू शकत नाही हे नक्की, असे राज ठाकरे म्हणतात.पण, ह्या उत्सवात दहा दिवस आणि मुख्यतः मिरवणुकांच्या वेळेस डीजे, डॉल्बी ह्यांच्या आवाजाच्या कर्कश्श पातळीमुळे हृदय बंद पडणं आणि मृत्यू येणं, किंवा तात्कालिक किंवा कायमचं बहिरेपण येणं, किंवा गेले काही वर्ष तर मिरवणुकीच्या दरम्यान लेझर लाईटमुळे अनेकांची दृष्टी जाणं हे प्रकार वाढले आहेत. ह्यात मिरवणुकीत येऊन, नाचून, आनंद व्यक्त करून लोकं निघून जातात. मात्र, पोलिस असतील किंवा इतर प्रशासकीय यंत्रणांमधील लोकं असतील, त्या भागात राहणारे स्थानिक रहिवासी असतील त्यांची अवस्था खरंच गंभीर आहे. सलग चोवीस, चोवीस तास आवाज कानावर पडून अनेकांची श्रवण शक्ती कमी झाली असेल, तर आश्चर्य वाटायला नको. आपल्या आनंदाची, उत्सवाची मोजावी लागणारी ही किंमत ही मोठी नाही का? असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

# अल्पवयीन मुलिचे लैंगिक शोषण करून व्हिडीओ प्रसारित करणे पडले महागात

**गोंडपिपरी –**प्रेमसमंधातून अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण करून व्हिडीओ प्रसारित केल्याची खळबळजनक घटना ३० ऑक्टोंबर रोज शनिवारला उघडकीस आली.आरोपीने एका अल्पवयीन मुलीला प्रेम संबंधात फसवून तिच्याशी शारीरिक सबंध प्रस्थापित केले.लैगिक शोषण करून चित्रफीत बनवून अनेक ठिकाणी प्रसारित केली. या गंभीर घटनेची दखल घेत आरोपीला गोंडपिपरी पोलिसांनी तात्काळ अटक करून पोस्को अंतर्गत ३७६/६ गुन्हा दाखल केला असून पुढील तपास ठाणेदार जीवन राजगुरू करीत आहे. अल्पवयीन मुलीच्या प्रसारित व्हिडीओची चौकशी सुरू असून आरोपीसह कुणी व्हिडीओ प्रसारित केला का याचा देखील तपास राजगुरू यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

# स्वच्छतेसाठी 'एक तारीख एक तास' उपक्रम

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे श्रमदान

**पुणे–**वच्छ्ता हीच सेवा या अभियानांतर्गत स्वच्छतेसाठी 'एक तारीख एक तास' या उपक्रमात पुणे महानगरपालिकेच्यावतीने आयोजित वॉकेथॉनमध्ये सहभागी होऊन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी हाती झाडू घेत श्रमदान केले. स्वच्छ्ता ही लोकचळवळ झाली असून स्वच्छतेबाबतची आपल्या देशाविषयीची प्रतिमा बदलत आहे, असे प्रतिपादन मंत्री पाटील यांनी केले. यावेळी पुणे महानगर पालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, विकास ढाकणे, घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त संदीप कदम यांच्यासह महानगरपालिकेचे विविध विभागप्रमुख उपस्थित होते.यावेळी पालकमंत्री पाटील



म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे अनेक विषयामध्ये सर्वसामान्य नागरिकांना जोडून घेत त्याची लोकचळवळ निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत. गेल्या साडेनऊ वर्षात सर्वसामान्यांना स्वच्छ्ता मोहिमेशी जोडत आपल्या देशाची स्वच्छतेबाबतची प्रतिमा बदलली आहे.आज शहरात साडेतीनशे पेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छतेसाठी उपक्रम राबविण्यात आला. यात दीड लाखाहून अधिक लोक सहभागी झाले आहेत हे या अभियानाचे यश आहे. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, विविध संस्था, कारखाने, स्वयंसेवी संस्था यात सहभागी झाले असून लोकसहभागाचे मोठे यश अभियानाला लाभले आहे. यातूनच स्वच्छतेची सवय निर्माण होण्यास मदत होते, असेही ते म्हणाले.'स्वच्छता हीच सेवा' उपक्रमाअंतर्गत पुणे महापालिकेच्या वतीने आयोजित वॉकेथॉनमध्ये महापालिका परिसर, शनिवार वाडा, भिडे पूल आदी ठिकाणी पालकमंत्री यांनी सर्वांसोबत सहभागी होत स्वच्छता केली. यावेळी त्यांनी उपस्थितांना स्वच्छ्ता विषयक शपथ दिली तसेच स्वच्छ्ता कर्मचाऱ्यांशीही संवाद साधला.

# विघ्नहर्त्याला निरोप देऊन केली दहा हजाराची कॅन्सरग्रस्त रुग्णाला मदत

गोंडपिपरी–विघ्नहर्त्या गणरायाला शुक्रवारी गोंडपिपरीत मोठ्या उत्साहात वाजत गाजत निरोप देण्यात आला.त्यानंतर गणेश मंडळाने कॅन्सरग्रस्त रुग्णाला आर्थिक मदत करत समाजापुढे आदर्श निर्माण केल्याने मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सद्यस्थितीत गणेश मंडळ म्हटलं की सामाजिक बांधिलकीचा अभाव म्हनून त्या मंडळाकडे पाहले जाते.परंतु तीच मंडळे आता समाज परिवर्तनाच्या वाटेवर दिसत आहे तसाच एक अनुभव गोंडपिपरीकरांना आला असून येथील स्थानिक प्रभाग क्रमांक ४ येथील अशपाक मोहमद शेख युवक कॅन्सरग्रस्त असून नागपूर येथे उपचार घेत आहे.गणरायाला निरोप दिल्यानंतर उत्सवातून उरलेल्या रकमेचा अनावश्यक खर्च न करता



महादेव वार्ड येथील युवा गणेश मंडळाने दहा हजाराची आर्थिक मदत अशपाक शेख यांच्या कुटुंबीयांना करून समाजापूढे आदर्श निर्माण केला.

# मोबाईलचे रील नको आजी–आजोबांच्या गोष्टीच हव्या ; नातवंडांना सुरक्षित सहवास

**सोलापूर । प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाच्या विश्वात लहानापासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्या हातात मोबाईल दिसतो. त्यातील 'रिल' संस्कृती फोफावत चालली आहे. त्यामुळे समाज बदलत चालला आहे किंबहुना बिघडत चालला आहे अशा प्रतिक्रिया समाजातूनच येतात. मात्र हे बदलून येणारी पिढी संस्कारक्षम घडवायची असेल तर हातातील मोबाईल बाजुला ठेवून त्या हातात आजी-आजोबांचा हात येणे गरजेचे बनले आहे.आजच्या काळात नोकरीनिमित्ताने आई-बाबा दूर गावी राहात असल्याने नातवंडांना आजी-आजोबांचा सहवास कमी मिळत आहे. अनेक ठिकाणी तर सासू-सुनांच्या भांडणांमुळे आजी-आजोबा नातवंडांजवळ नसतातच. आजी-आजोबांचा सहवास नसल्याने मुले एकलकोंडी होतात. नोकरीवरून दमून येणार आई-बाबा त्यांच्यासमवेत खेळू शकत नाहीत.त्यांच्याशी गप्पा मारायला त्यांच्या विश्वात रमायला कंटाळतात. पर्यायाने आई-बाबाच लहान मुलांच्या हाती मोबाईल देतात. आमचा मुलगा मोबाईल दिला की शांत राहतो अन्यथा तासंतास रडतो अशा प्रतिक्रिया देणारे आई-बाबा आता सर्वत्र आढळून येत आहेत. खरतर अशा वेळी आजी-आजोबांची सोबत ही नातवंडांची नितांत गरज असते. दिवसभर सोबत असणारे आजी-आजोबा हे नातवंडांसाठी जगण्याचा आनंद असतात. जीवनाला



दिशा दाखवणारे मार्गदर्शक असतात. हसत खेळत गोष्टी सांगून आपसूक संस्कार घडविणारी शाळाही असतात.मोबाईल हातातून काढून घेतला म्हणून दहा वर्षीय मुलाने आत्महत्या केल्याच्या घटनाही आपण ऐकतो. मुळात दहा वर्षांच्या मुलाला आत्महत्या हे सांगितले कोणी? तर त्याचे उत्तरही मोबाईल किंवा टिव्ही असेच द्यावे लागेल. दुर्दैवाने टीव्ही किंवा मोबाईलवर काय पाहावे किती वेळ पाहावे हे सांगणारेही घरात कोणी ज्येष्ठ आजकाल दिसत नाहीत.माढा तालुक्यातील केदार वस्तीतील एका जिल्हा परिषद शाळेचे उदाहरण पाहिले तर लक्षात येईल की आजी-आजोबांशिवाय मुले कशी उदास असतात. शाळेतील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षिका प्रतिभा सुभाष नवले यांनी सर्व मुलांना दररोज आजी-आजोबा, आई-बाबांना नमस्कार करून यायला सांगितले. अशी सूचना मिळताच वर्गातील एक मुलगा रडायला लागला.माझे आजी-आजोबा गावातच दुसरीकडे जातात. त्यांच्याकडे आई-बाबा मला जाऊ देत नाहीत ही त्याची तक्रार होती. प्रतिभा नवले यांनी त्या मुलाला सांगितले की आई-बाबांना दररोज विचार की आजी-आजोबांना नमस्कार करायला जाऊ का? त्याचा परिणाम असा झाला की चौथ्या दिवशी त्याला परवानगी मिळाली. तो आजी-आजोबांच्या घरी गेला आणि नमस्कार करताच आजोबांनी त्याला मिठी मारली. पर्यायाने त्या दोन्ही घरातील दुरावाही आता कमी झालाय.

# यापुढेही पाण्याच्याच मुद्द्यावर निवडणुका

**सांगोला । प्रतिनिधी**

तालुक्यातील जनतेने आमदार बदलले, राज्यातील मायबाप जनतेने सरकार बदलले. राज्याची सत्ता चालवण्याची सर्वच प्रमुख पक्षांना संधीही मिळाली. अशा परिस्थितीतही सांगोला तालुक्यातील निवडणुकांमधील पाण्याचा मुद्दा काही बदललेला दिसून येत नाही. गेली अनेक वर्षे निवडणुका आल्या म्हटले, की पाण्याचा मुद्दा समोर येतच होता. आगामी निवडणुकांतही हा मुद्दा पुन्हा चांगलाच गाजणार असल्याचे सध्या तरी दिसून येत आहे. यापुढेही पाण्याचा राजकारणातील श्रेयवाद, पाणी पूजनाचे पक्षीय 'वॉर' दिसून येतील.तालुक्यात हक्काचे पाणी मिळवण्यासाठी विविध नेतेमंडळी आपल्या परीने प्रयत्न करतात. पाणी आल्यास पाणी पूजनाबरोबरच आपण कसे प्रयत्न केले, याबाबत ते जाहीरपणे बोलतात. परंतु, वेळेवर व हक्काचे पाणी न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याची जबाबदारी कोणीच घेत नाही.पाण्यातच खरे राजकारण मुरतंय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुका पुन्हा एकदा तालुक्यातील या प्रमुख उपसा सिंचन योजनेच्या पाणी प्रश्नावरच फिरणार असून, सामान्य शेतकरीच याबाबत उमेदवारांना, लोकप्रतिनिधींना जाब विचारतील, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.यावर्षी



सांगोला तालुक्यात सरासरीच्या फक्त ५५ टक्केच्या आसपासच पाऊस झाला आहे. सद्य:परिस्थितीत मोठा पाऊस न झाल्यास यापुढे शेतीच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवणार आहे. यावेळी नीरा उजवा कालव्याला आलेल्या पाण्यासाठी या लाभक्षेत्रातील टेलच्या शेतकऱ्यांना हक्काचे पाणी मिळण्यासाठी आंदोलने करावी लागली होती.पाणी येत असले तरी ते नियोजनाप्रमाणे येत नसून ते नेहमीच कमी दाबाने मिळते. त्यामुळे तालुक्यातील नीरा उजवा हक्काचे पाणी वेळेवर व टेलच्या शेतकऱ्यांना नियमानुसार मिळत नाही. हे पाणी जाते तरी कुठे? हा राजकीय डावपेचच असल्याचे सामान्य शेतकरी बोलत आहेत.टेंभू, म्हैसाळ व नीरा उजव्याच्या पाण्यासाठी, त्याच्या नियोजनासाठी आम्ही अधिकाऱ्यांबरोबर, मंत्र्यांसोबत कशा बैठका घेतल्या, याबाबत व आलेल्या पाण्याच्या पूजनाबाबत सध्या तालुक्यात पुन्हा श्रेयवादाचे राजकारण सुरू झाले असल्याचे दिसून येत आहे. या श्रेयवादातूनच राजकारणातील पक्षीय 'वॉर' होणार आहेत. निवडणुका जशा जवळ येतील तसा पाण्याबाबतचा श्रेयवाद पुन्हा उफाळून येणार आहे.

# रंगभूमीवर 'नथुराम' विरुद्ध 'नथुराम'!

# मराठी रंगभूमीच्या इतिहासात गेल्या १५० वर्षात घडले नाही असे 'मी नथुराम गोडसे बोलतोय'च्या अभिनेत्याचे कृत्य!

## शरद पोंक्षेंनी नाटकाचे शीर्षक पळविल्याचा निर्माते उदय धुरत यांचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी रंगभूमीच्या इतिहासात गेल्या १५० वर्षात घडले नाही असे कृत्य'मी नथुराम गोडसे बोलतोय'या बहुचर्चित मराठी नाटकाच्या निमित्ताने घडत आहे,शीर्षकासह या नाटकाची संहिताच ढापण्याचा हा प्रकार घृणास्पद व निंदनीय आहे. प्रचंड मेहनत घेऊन,संशोधन करून दिवंगत जेष्ठ लेखक प्रदीप दळवी यांनी लिहिलेल्या'मी नथुराम गोडसे बोलतोय'या नाटकाच्या लिखाणाचे व शीर्षकाचे श्रेय या नाटकाद्वारे अभिनेता म्हणून नावलौकिक मिळविणाऱ्या व्यक्तीनेच करावे हे मराठी रंगभूमीसाठी शोभनीय नाही. यामुळे चुकीचा पायंडा पडला जाईल आणि अनेक प्रतिभावंत नाटककारांचे श्रेय लाटण्याची परंपरा सुरु होईल अशी खंत निर्माते उदय धुरत व्यक्त करतात.काही वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीवर प्रचंड वादग्रस्त ठरलेला 'नथुराम गोडसे' पुन्हा रंगभूमीवर येत आहे. एकाच वेळी येऊ घातलेल्या दोन नाटकांमुळे 'नथुराम विरुद्ध नथुराम' असे चित्र रंगभूमीवर दिसणार असून,त्यावरून वादाचे 'प्रयोग' रंगण्यास सुरुवात झाली आहे. यापूर्वी रंगभूमीवर गाजलेले 'मी नथुराम गोडसे बोलतोय' हे माऊली प्रॉडक्शनचे नाटक लवकरच पुन्हा रंगभूमीवर येणार आहे. त्याचबरोबर या नाटकात 'नथुराम'च्या भूमिकेत दिसलेले अभिनेते शरद पोंक्षे यांनी 'नथुराम गोडेसे बोलतोय' हे नाटक घेऊन येत असल्याचे जाहीर केले आहे. नाटकाचे शीर्षक जवळपास सारखे असल्याने त्यावरून न्यायालयीन लढाई सुरु झाली असून निर्माते उदय धुरत यांनी पोंक्षे यांना ७२ तासांचा कालावधी दिला असून जर त्यांनी माघार घेतली नाही तर कोर्टाची पायरी चढण्याची तयारी सुरु केली आहे.ज्येष्ठ नाटककार प्रदीप दळवी लिखित 'मी नथुराम गोडसे बोलतोय' हे नाटक नाट्यनिर्माते उदय धुरत यांनी १० जुलै १९९८ साली माऊली प्रॉडक्शनतर्फे रंगभूमीवर आणले होते. या नाटकाचे दिग्दर्शन लोकप्रिय अभिनेते दिग्दर्शक विनय आपटे यांनी केले होते. शरद पोंक्षे यांनी त्यात नथुरामची भूमिका साकारली होती. त्यांची भूमिका लोकप्रियही ठरली होती. वादग्रस्त विषयामुळे हे नाटक खूप चर्चेत राहिले. नाटकाचे ८१६ प्रयोग झाल्यानंतर २०१६ मध्ये निर्माते



धुरत यांनी हे नाटक थांबविण्याचा निर्णय घेतला.नाट्यनिर्माते धुरत 'मी नथुराम गोडसे बोलतोय' हे नाटक पुन्हा घेऊन येत आहेत. विवेक आपटे याचे दिग्दर्शन करीत असून,त्याच्या तालमी ३ ऑक्टोबरपासून सुरू होत आहेत. या नाटकात 'नथुराम'च्या भूमिकेत अभिनेता सौरभ गोखले दिसणार आहे. हे नाटक ऑक्टोबरमध्ये येणार असल्याची जाहिरात जुलैमध्ये वर्तमानत्रांत प्रसिद्ध झाली होती. 'नथुरामच्या भूमिकेतील कलाकाराचे नाव निश्चित झाल्यानंतर आता नाटकाच्या तालमी सुरू होत आहेत. नोव्हेंबरमध्ये हे नाटक रंगभूमीवर येईल',असे दिग्दर्शक विवेक आपटे यांनी सांगितले.आमच्या माऊली प्रॉडक्शन्सची जाहिरात पाहून शरद पोंक्षे यांनी 'नथुराम गोडसे बोलतोय' या नाटकाची लेखक दिग्दर्शकाचे नाव नसलेली जाहिरात १५ ऑगस्टला प्रसिद्ध केली. पोंक्षे या नाटकात प्रमुख भूमिकेत असून,नाटकाचे ५० प्रयोग होणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. 'एवढ्या मोठ्या कलाकाराला एका ज्येष्ठ नाटककाराच्या संहितेची - शीर्षकाची गरज का भासली?नाटकाच्या संहिता - शीर्षकावरून न्यायालयीन लढाई होईल',असे धुरत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या संदर्भात धुरत यांच्याकडून पोंक्षे यांना आतापर्यंत तीन नोटिसा पाठविण्यात आल्या असून शेवटच्या नोटीसची मुदत ७२ तासांची आहे. या पत्रकार परिषेदेत कायदेशीर माहिती जेष्ठ वकील ए. एल. गोरे यांनी दिली.

**नवा नथुराम कोण?**

'मी नथुराम गोडसे बोलतोय' हे नाटक नव्याने रंगभूमीवर येत असताना 'नथुराम'च्या भूमिकेचे आव्हान कोण पेलणार याविषयी उत्सुकता होती. नथुरामच्या भूमिकेसाठी सुमारे २५-३० कलाकारांच्या ऑडिशन्स घेण्यात आल्या. त्यानंतर अभिनेता सौरभ गोखलेची निवड झाली. सौरभ ही आव्हानात्मक भूमिका कशी साकारणार याकडे नाट्यरसिकांसह नाट्यसृष्टीचे लक्ष असेल.

# गोंडवाना विद्यापीठाचा वर्धापन दिन होणार उत्साहात साजरा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

२ ऑक्टोबर २०११ हा दिवस विद्यापीठाचा वर्धापन दिन म्हणुन साजरा केला जातो . २ ऑक्टोबर २०२३ रोजी विद्यापीठ १२ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करीत १३ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्या निमित्ताने विविध पुरस्काराचे वितरण , परीक्षा भवन व मॉडेल कॉलेज भवनाचे लोकार्पण तसेच विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे.सोमवार, दि. २ ऑक्टोबर २०२३, दुपारी १२.०० वाजता ,महाराजा सेलिब्रेशन हॉल ऍन्ड लॉन, माडीया तुकुम, धानोरा रोड, सिटी हार्ट हॉटेल जवळ, येथे संपन्न होत आहे .या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री , महाराष्ट्र राज्य, चंद्रकांतदादा पाटील मुख्य अतिथी अन्न व औषधी प्रशासन मंत्री , महाराष्ट्र राज्य, धर्मरावबाबा आत्राम, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हाधिकारी, गडचिरोली संजय मीणा , प्र-कुलगुरु, डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण आदी उपस्थित राहणार आहे .

**मेरी माटी मेरा देश या उपक्रमाची गिनीज बुक वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद करावयाची असल्यामुळे सर्वांचा सहभाग महत्वाचा आहे. गोंडवाना विद्यापीठाशी सलंग्नित महाविद्यालयानी मेरी माटी मेरा देश या उपक्रमा अंतर्गत जमा केलेल्या मातीचा अमृत कलश गोंडवाना विद्यापीठाच्या रासेयो विभागाचे संचालक डॉ. श्याम खंडारे यांच्या हस्ते उच्च व तंत्र शिक्षण मंत्री , चंद्रकांतदादा पाटील यांना सुपूर्द करण्यात येणार आहें**

# विवेकानंद महाविद्यालयात स्वच्छता ही सेवा हा कार्यक्रम संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १ ऑक्टोंबर रोज रविवारला सकाळी १० वाजता स्वच्छता ही सेवा या कार्यक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नामदेव उमाटे यांच्या शुभहस्ते अभियानाची सुरुवात करण्यात आली. महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व विद्यार्थी - विद्यार्थिनी यांनी उत्साहाने या कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदविला. याप्रसंगी महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना




कार्यक्रम अधिकारी डॉ. उत्तम घोसरे, डॉ रमेश पारेलवार यांनी केले होते. विवेकानंद ज्ञानपीठ (कॉन्व्हेंट), वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, सचिव अमन टेमुर्डे, प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेल्या या स्वच्छता अभियानात डॉ.विजय टोंगे, डॉ.ज्योती राखुंडे, डॉ सुहास तेलंग, डॉ यशवंत घुमे, प्रा.रामकृष्ण मालेकर, प्रा.सुभाष खोके, प्रा श्रीकांत दाते, प्रा.राजीव बैरम, प्रा.अमोल ठाकरे, गौतम खोब्रागडे, गणेश गौरकर इत्यादींसाठी अनेकांची उपस्थिती होती

# 'सलोखा' मिटवणार शेतकऱ्यांची डोकेदुखी

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात शेतकऱ्यांना शेतात जाणारे मार्ग नेहमीच डोकेदुखी ठरत असतात.रस्त्याच्या दैनिय अवस्थेमुळे शेतकऱ्याला शेतात जाताना अनेक संकटांना सामना करावा लागतो.मात्र आता शासनाने 'सलोखा' योजनेअंतर्गत शेतीचे वाद व पांदण रस्त्याची निर्मिती करणार असल्याने शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे.

उपविभागीय अधिकारी बालाजी शेवाळे यांच्या अध्यक्षतेखाली दलित मित्र वि.तु नागापुरे अध्यापक विद्यालय गोंडपिपरी येथे पाहणी व सलोखा योजना तसेच इतर विविध योजने संदर्भात मार्गदर्शनपर आढावा सभा पार पडली .या सभेस तहसीलदार शिवाजी कदम, उपविभागीय कार्यालयाचे



नायब तहसीलदार राजेश मडामे यांच्यासह गोंडपिपरी व पोंभुरणा तालुक्यातील सर्व तलाठी, मंडळ अधिकारी तसेच ग्रामपंचायत निहाय सरपंच उपस्थित होते. या सभेमध्ये इपिक पाहणी नोंद करण्याकरिता प्रत्येक शेतकऱ्याने मोबाईल मधील ई पिक या अँप वर पीक पेरा नोंद करण्याबाबत व सलोखा योजना अंतर्गत मालकी हक्काबद्दल उपविभागीय अधिकारी बालाजी शेवाळे यांनी मार्गदर्शन केले .सोबतच उपस्थित सरपंचांना गावातील विकासाच्या दृष्टीने विविध योजनांबाबत संपूर्ण माहिती देण्यात आली.तसेच शेत शिवारातील आवश्यक पांदण रस्ते काढण्यासाठी तीन दिवसात तलाठी यांनी सरपंच यांच्या सहाय्याने पाठविण्याचे निर्देश दिले

**आदिवासी समाज बांधव प्रगतीच्या वाटेवर..**

**पोंभुरणा तालुक्यातील आदिवासी नागरिकांची भटाळी गावात मोठ्या संख्या आहे. येथील १३८ खातेदार लोकांनी ई पिक पाहणी अँप द्वारे आपल्या सातबाऱ्यावर पिक पेरा ची नोंद केली असल्याची माहिती नयब तहसीलदार राजेश मडामे यांनी दिली**

# आर्थिक विवंचनेतून गळफास घेऊन शेतकऱ्याची आत्महत्या

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यातील चेक लिखितवाडा येथील शेतकऱ्याने आर्थिक विवंचनेतून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि.(३०) शनिवारी उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली.

लिखितवाडा येथील मृतक शेतकरी शांताराम श्रावण कोहपरे वय (५०) यांच्या शेतात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेत पिकाची नुकसान झाली.सततच्या दुबार तिबार मशागतीने शांताराम हे अनेक दिवसांपासून आर्थिक विवंचनेत होते.अशातच ते ३ दिवसांपूर्वी घरातून घरी कुणालाही काही न सांगता बेपत्ता झाले. दोन दिवस वाट पाहून कुटुंबियांनी अखेर पोलीस स्टेशन गाठून बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. शनिवारी सकाळी ७ वाजता दरम्यान कुटुंबीय शेतात गेले असता गळफास घेतलेल्या अवस्थेत शांताराम यांचा मृतदेह आढळला.गोंडपिपरी पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणी साठी पाठवला असून पुढील तपास ठाणेदार जीवन राजगुरू करीत आहे.शांताराम कोहपरे च्या पच्यात आई,पत्नी,मुलगा असा आप्त परिवार आहे.

# भाजपाच्या वतीने ईद-ए-मिलाद निमित्त मौलाविंचा सत्कार व शीतपेय वाटप

**राजुरा । प्रतिनिधी**

इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मुहम्मद पैगंबर यांचा जन्मोत्सव (ईद-ए-मिलाद) राजुरा शहरात मोठ्या उत्साहात विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी राजुरा विधानसभा प्रमुख देवराव भोंगळे यांनी सुधीर भाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र व राजुरा विधानसभा जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने मुस्लीम समाजबांधव व मौलविंचा गुलाब पुष्प, शाल देऊन स्वागत केले व सर्वांना शीतपेय वाटप करण्यात आले.

इस्लामी कालगणनेतील 'रबीऊल अव्वल' महिन्याच्या १२ तारखेला प्रेषित मुहम्मद पैगंबर यांची जयंती दरवर्षी साजरी केली जाते. मागील दोन वर्षांपूर्वी सर्व सण-उत्सवांप्रमाणे ईद-ए-मिलादवर सुद्धा कोरोनाचे सावट होते. कोरोनाची लाट नियंत्रणात येताच मागील वर्षापासून मुस्लीम समाज बांधवानी मोठ्या उत्साहात हा सण साजरा केला. शहरातील मध्यभागी असलेल्या जामा मस्जिद च्या वतीने देवराव भोंगळे यांचा समाजबांधवांनी सत्कार केला. शहरातील सर्व मस्जिद मधील बांधव मध्यभागी असलेल्या जामा मस्जिद मध्ये



एकत्र येत शहराच्या मध्यभागातील बाजारपेठेतून जुलूस काढण्यात आला. भाजपा कार्यालया जवळील मध्यवर्ती सहकारी बँकेसमोर भाजपाच्या वतीने उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये मुस्लीम मौलावि साबीर नुरी, गुलाम अहमद रजा, समशान हुसेन, हाफिज फारुख सिद्दीकी, जमीर खान, हाफिज मफ्तुल रजाक, कासिम जमिर कुरेशी यांचा सत्कार करण्यात आला व समाजबांधवांना गुलाबपुष्प देत शुभेच्छा देऊन शीतपेय वाटप केले. प्रेम व सद्भावनेतून माणुसकी जपण्याचा संदेश मोहम्मद पैगंबरांनी दिला. हिच शिकवण आत्मसात करून सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी संकल्प करण्याचा विश्वास यावेळी देवराव भोंगळे यांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष तथा माजी सभापती सुनिल उरकुडे, विलास बोनगीरवार, आरपीआयचे नेते सिद्धार्थ पथाडे, संजय उपग्नालावार, सुरेश रागीट, विनोद नरेन्दुलवार, सतिश धोटे, राधेश्याम अडाणीया, बाबा बेग, भाजपा तालुका अल्पसंख्यांक अध्यक्ष सय्यद सहजाद अली, अब्दुल सईद कुरेशी, हसद कुरेशी, मुर्तुजा बेग, हैदर भाई, अब्दुल राजिक कुरेशी, सोमेश्वर आईटलावार, महादेव तपासे, दिलीप गिरसावळे, जनार्धन निकोडे, दिलीप वांढरे, एजाज अहमद, नितीन वासाडे,मोहन कलेगुरवार, सचिन शेंडे, फारुख शेख, पूनम शर्मा, छबिलाल नाईक, तोफिक शेख, प्रमोद पानघाटे, पत्रकार श्रीकृष्ण गोरे, सय्यद जाकिर, शाहनवाज कुरेशी आदींची उपस्थिती होती.

# वरोऱ्यात शिवाजी मोघे यांचे निषेधार्थ माना जमातीचा भव्य मोर्चा

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा येथे दिनाक १ ऑक्टोंबरला माना जमातीचे वतीने माजी मंत्री व कॉंग्रेसच्या आदिवासी सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजी मोघे यांनी केलेल्या असंविधानिक वक्तव्याविरोधात माना जमातीच्या वतीने भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला.

माना जमात प्रामुख्याने विदर्भातील जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वास्तव्य असून माना ही स्वतंत्र आदिवासी जमात असून तिची स्वतंत्र धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक परंपरा आहेत. केंद्र शासनाच्या अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये क्रमांक १८ वर आहे. सन १९५५ मध्ये काका कालेलकर आयोगांनी माना जमातीला अनुसूचित जमातीचे सर्व अधिकार व हक्क बहाल केले आहे. मात्र नागपूर येथील आदिवासी क्षेत्रबंधन मुक्ती दिवस निमित्य जाहीर कार्यक्रमात माजी मंत्री शिवाजी मोघे यांनी आदिवासी माना जमाती बाबत हमारी सरकार आयी तो हायर पॉवर कमिशन नेमो. उसमे गलती से जो जो जातीया आयी उसमे जो गलतीसे एन्ट्री आयी है उसमे माना भी है. यह माना भी गलत है यह गोंड माना उसके लिये है. सब माना के लिए नही है यह गलत है इसको निकाल डालो. अशा प्रकारचे वक्तव्य केले आहे. त्यांचे हे विधान केवळ द्वेष भावनेतून करून संपूर्ण माना जमातीचा अवमान केला, जमाती जमातीत तेढ निर्माण करून अशांतता निर्माण केली. यावक्तव्यामुळे संतप्त झालेल्या आदिवासी माना जमातीने १ ऑक्टोंबरला दुपारी १२ वाजता उपविभागीय कार्यालय वरोरा येथे भव्य निषेध मोर्चा काढला. सदर मोर्चा डॉ. अब्दुल कलाम चौक ते



उपविभागीय कार्यालय या मार्गाने काढून मोघे यांच्या विरोधात घोषणाबाजी व निदर्शने करून निषेध व्यक्त केला. नागपूर येथील जाहीर कार्यक्रमात माना जमातीचे विरोधात शिवाजी मोघे यांनी चुकीचे वक्तव्य केले त्यावेळी विरोधी पक्ष नेते तथा आमदार विजय वडेट्टीवार, माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी हे नेते सुद्धा उपस्थित होते. यादोन्ही नेत्यांचे मतदारसंघात मोठ्या प्रमाणात माना जमातीचे वास्तव्य असून त्यांनीही चुकीच्या वक्तव्याचा विरोध केला नाही याबाबतही जाहीर नाराजी व्यक्त केली. त्यावेळी वरोरा व भद्रावती तालुक्यातील गावा गावातील माना जमातीचे विद्यार्थी, महिला व पुरुष, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. निवेदन देण्यापूर्वी उपस्थितांना आदिवासी माना जमात विद्यार्थी युवा संघटना महाराष्ट्र, तालुका शाखा वरोरा, आदिम माना जमात मंडळ मुबई, शाखा वरोरा वरोरा तालुका माना जमात विकास संस्था, वरोरा यांचे प्रतिनिधीचे भाषणे झाली. त्यानंतर प्रतिनिधी शिष्टमंडळानी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देत शिवाजी मोघे माजी मंत्री यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात यावा अशी मागणी केली. भविष्यात माना जमातीचे विरोधी असे वक्तव्य केल्यास लोकशाही मार्गाने तीव्र लढा देईल यासाठी शासन व प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील असा इशारा देण्यात आला. याप्रसंगी प्रकाश झाडे विनोद खडसनप्रकाश झाडे विनोद खडसे ग्रामसेवक दडमल निखिल राणे पियुष गजबे या शिष्टमंडळाने तहसीलदार यांना निवेदन दिले. सोबतच समाजाच्या वतीने शिवाजी मोघे आणि रोशन गांगुर्डे यांच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .